



दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २६७
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, शुक्रवार, दि.०९ मे २०२५

## थोडक्यात

### 'दै.अक्षराज' चे पत्रकार वसंत रांधवण यांना 'पारनेर भूषण' पुरस्कार जाहीर



**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.०८, सुपा (पारनेर) :** पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथिल रहिवासी पारनेरचे भूमिपुत्र व अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे पारनेर तालुका उपाध्यक्ष तसेच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ पारनेर तालुका उपाध्यक्ष पत्रकार वसंत रांधवण यांची राज्यातील गरुड फाउंडेशन, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय पारनेर भूषण पुरस्कार २०२५ करीता नुकतीच निवड करण्यात आली असल्याचे गरुड फाउंडेशनचे कार्याध्यक्ष तथा आयोजक रमेश खेमनर यांनी वसंत भानुदास रांधवण यांना निवडीचे पत्र देऊन कळविले आहे. शनिवार दि.७ जून २०२५ रोजी सकाळी ११ वाजता महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी या ठिकाणी विविध क्षेत्रातील नामवंत लेखक आणि मान्यवरांच्या उपस्थितीत राज्यस्तरीय पारनेर भूषण पुरस्कार २०२५ देऊन वसंत रांधवण यांना सन्मानित करण्यात येणार आहे. वसंतराव रांधवण पारनेर तालुक्यातील पत्रकार असून, निर्भिडपणे ग्रामीण भागातील प्रश्न मांडत आहे. अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे पारनेर तालुका उपाध्यक्ष तसेच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ पारनेर तालुका उपाध्यक्ष म्हणून ते कार्यरत आहे. समाज सुधारकांच्या जयंती साजरी करणे, विविध सामाजिक कार्यक्रमात सहभाग घेऊन मागिल १६ वर्षापासून सातत्याने सामाजिक कार्य करत आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना राज्यस्तरीय पारनेर भूषण पुरस्कार जाहीर केला असल्याचे गरुड फाउंडेशनचे अध्यक्ष आकाश पुजारी व आयोजक रमेश खेमनर यांनी सांगितले.हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल दैनिक अक्षराज मिडियाचे मुख्य संपादक विनोद गोरे, सहसंपादीका प्राजक्ता चव्हाण -गोरे, खासदार निलेश लंके, आमदार काशिनाथ दाते, खासदार निलेश लंके , निलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब खिलारी, पारनेर तालुक्यासह जिल्ह्यातील पत्रकारांनी, सामाजिक, राजकीय सर्वच क्षेत्रातून वसंत रांधवण यांचे अभिनंदन होत आहे.

### कबड्डीत महाराष्ट्राला रौप्यपदक !



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०८, राजबीर :** हरियाणाने कबड्डीतील हुकुमत कायम राखत ७व्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राला नमवित सुवर्णपदक पटकावले. ३९-२८ गुणांनी हरियाणाने बाजी मारली. राजबीर क्रीडा संकुलात विजयाचा चौकार झळकवित महाराष्ट्राने अंतिम फेरीत मजल मारली होती. अपेक्षेप्रमाणे अंतिम मुकाबला बलाढ्य हरियाणा विरूध्द महाराष्ट्राच्या कबड्डीपटूंनी चिवट झुंज दिली. पहिल्या फेरीत २२ -१७गुणांनी महाराष्ट्राने आक्रमण करीत आपले आव्हान कायम राखले होते. उत्तरार्धात हरियाणाच्या यशस्वी चढय्या आणि बचावात अपयश आल्याने महाराष्ट्राची पिछेहाट होत राहिली. लोणमुळे पिछाडी वाढत गेल्याने मनोबल खचलेल्या महाराष्ट्राला रौप्य पदकावर समाधान मानावे लागले. गतवेळी कांस्य पदक संपादन केले होते.

### पाणी माफियावर कारवाई करा : शिवसेना उबाठा दिवा शहर मागणी



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०७, दिवा (ठाणे) :** दिवा शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य जलवाहिनीवर पाणीमाफिया दरोडा टाकत आहेत. त्यामुळे शहरात मोठ्या प्रमाणात पाणीटंचाई निर्माण झाली आहे. हंडाभर पाण्यासाठी माता-भगिनींना वणवण फिरावे लागत असून नागरिकांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. पाणीमाफियांचा 'दिवा' कायमचा विझवा अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

दिवा शहरातील नागरिकांना पाणी बिल भरूनही पाणी मिळत नाही. भरउन्हात दिवा शहरात भीषण पाणीटंचाई असून शहरातील नागरिक पाण्यासाठी वणवण भटकत आहेत. नागरिकांच्या प्रत्येक सुट्टीत रविवार हा पाणी लाईन चेक करणे आणि पाणी प्रश्न सोडवण्यासाठी जातो. साबे गाव, दिवा गाव, दातिवली, नागवाडी, बी. आर. नगर, मुंब्रादेवी कॉलनी, साळवी नगर, साईनगर, डी. जे. कॉम्प्लेक्स परिसर, जीवदानीनगर, बेडेकरनगर, गणेशनगर आदी परिसरात मोठ्या प्रमाणात पाणीटंचाई जाणवत आहे. शहरातील बेकायदा बांधकामे आणि पाणीमाफियांमुळे दिवा शहर पाणी समस्येचे आगार बनले आहे. तरी पाणी समस्येवर लवकरात लवकर तोडगा काढावा, अशी मागणी शिवसेनेचे शहरप्रमुख सचिन पाटील यांनी आयुक्तांकडे केली आहे.

ठाणे पालिका प्रशासन शहरात पाणीपुरवठा करण्यात अपयशी ठरत आहे. जोपर्यंत पाणीपुरवठा सुरळीत होत नाही तोपर्यंत टँकरद्वारे पाणी पुरवठा करावा.
**- सचिन पाटील, शहरप्रमुख.**

# पाकिस्तानकडून भारतात १५ शहरांवर हल्ल्याचा प्रयत्न !

**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि .०८, नवी दिल्ली :**

पहलगामविरोधात भारताने कडक पाऊले उचलली आहेत. 'ऑपरेशन सिंदूर'च्यानंतर सीमेवरील तणाव हा वाढलाय. पाकिस्तानकडून सीमा भागात गोळीबार केला जात आहे. भारतीय लष्कराने सीमा भागातील अनेक गावे रिकामी केली आहेत. पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी पर्यटकांना टार्गेट करत धर्म विचारून गोळीबार केला. याचा बदल भारताने जबरदस्त पद्धतीने घेतला आहे. मत्र, पाकच्या कुरापती या कमी होण्याचे नाव घेत नाहीत. पाकिस्तानकडून भारताच्या १५ शहरांमध्ये हल्ला करण्याचा प्रयत्न करण्यात आलाय.

भारताचे ऑपरेशन सिंदूर हे अजूनही सुरूच आहे. भारतातील १५ शहरांमध्ये हल्ला करण्याचा पाकिस्तानचा प्रयत्न भारताकडून हाणून पाडण्यात आलाय. सीमेवरील प्रत्येक घडामोडीवर सरकारचे लक्ष आहे. जालंधर, पठाणकोट, जम्मू काश्मीर, अमृतसर, अवंतीपुरा, आदमपूर, भुज, बठिंडा, लुधियाना, या शहरांवर पाकचा हल्ला करण्याचा प्रयत्न होता, जो भारताकडून हाणून पाडण्यात आलाय. गुजरात, राजस्थानमध्येही हल्लाचा प्रयत्न करण्यात आलाय. ड्रोन आणि क्षेपणास्त्र केली जप्त केली आहेत.

ऑपरेशन सिंदूर सुरुच; लाहोरची एअर डिफेन्स सिस्टिम उद्ध्वस्त, ड्रोन हल्ल्यांचा धडाका



पाकिस्तानकडून सीमावर्तीय भागांमध्ये नागरिकांना टार्गेट केले जात आहे. भारताकडून पाकिस्तानच्या हल्ल्याला सडेतोड उत्तर दिले जात आहे. पाकिस्तानच्या गोळीबारामध्ये तब्बल १६ नागरिकांचा जीव गेलाय. भारताने या हल्ल्याला उत्तर दिले. मुळात म्हणजे पहलगामवरील हल्ल्यानंतर पाकिस्तानाकडून सातत्याने गोळीबार केला जात आहे. पहलागमवर झालेल्या हल्ल्यानंतर भारताकडून पाकिस्तानच्या विरोधात कडक पाऊले उचलली गेली. पहलगाम हल्ल्यातील दहशतवादी हे पाकिस्तानमधून आल्याचे स्पष्ट झाले. गुजरात, राजस्थान आणि पंजाबमधील काही शहरांना पाकिस्तानकडून टार्गेट केले जात आहे. भारताने पाकिस्तानचे लाहोरची एअर डिफेन्स सिस्टिम उद्ध्वस्त केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांचा विदेश दौरा हा सर्व पार्श्वभूमिवर रद्द केला आहे. नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांचे सीमेवरील प्रत्येक गोष्टीवर बारीक लक्ष आहे. ऑपरेशन सिंदूरमध्ये भारताने पाकिस्तानमधील दहशतवाद्यांचे कंबरडे चांगलेच मोडल्याचे बघायला मिळतंय. ऑपरेशन सिंदूरनंतर काही व्हिडीओ आणि फोटो हे पुढे आलीय. भारताने दहशतवादी हल्ले पूर्णपणे उद्ध्वस्त केली आहेत.

# महाराष्ट्राच्या पदकांचा सुवर्णमहोत्सव ! सिद्धेश घोरपडेची पदक हॅट्रिक

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०८, राजबीर :** पदक तक्यात अव्वल स्थान कायम राखत महाराष्ट्राने ७व्या खेलो इंडिया युवा स्पर्धेत गुरुवारी ५१ पदकांचा पल्ला पार करत पदकांचा सुवर्णमहोत्सव साजरा केला. टेबलटेनिस दुहेरीत सुवर्णपदक जिंकत महाराष्ट्राच्या मुलींनी स्पर्धेतील ५० वे पदक जिंकले. त्यापूर्वी पुण्याच्या सिद्धेश घोरपडेने सलग तिसऱ्या दिवशी पदक जिंकत पदकांची हॅट्रिक साजरी केली.





खेलो इंडिया स्पर्धेत सर्वप्रथम पदकांचे अर्धशतक झळकविण्याची हॅटट्रिक करणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य ठरले आहे. स्पर्धेच्या पाचव्या दिवशी २० सुवर्ण, १६ रौप्य व १५ कांस्यपदकांची लयलूट करून महाराष्ट्राने अव्वल स्थान कायम राखले होते. आज संपलेल्या सायकलिंग, मल्लखांब स्पर्धेत महाराष्ट्राने सुवर्ण सांगता केली. दिल्लीत संपलेल्या सायकलिंग स्पर्धेत ३ सुवर्ण २ रौप्य व १ कांस्य पदकाची लयतूट करीत महाराष्ट्राने उपविजेतेपद पटकावले. गयातील मल्लखांब स्पर्धेत २ सुवर्ण ५ रौप्य व २ कांस्य अशी ९ पदके महाराष्ट्राने कमवून उपविजेतेपदावर नाव कोरले. जलतरणात सर्वाधिक १९ पदके महाराष्ट्राने जिंकली आहे. आर्चरीतील ६ सुवर्णासह ९ पदकांचा विक्रमी कामगिरी महाराष्ट्राने केली आहे.

सायकलिंगमध्ये पुण्याच्या सिद्धेश घोरपडेने सलग तिसऱ्या दिवशी पदक जिंकत पदकांची हॅट्रिक साजरी केली. ट्रॅक सायकलिंग स्पर्धेत गुरुवारी अखेरच्या दिवशी मराठमोळ्या सिद्धेशने केरिन रेसमध्ये बाजी मारत सुवर्ण पदकावर मोहर उमटवली. झारखंडचा बिकाश ओरेन रौप्य पदकांचा मानकरी ठरला, तर तेलंगणाच्या थानिश कुमार सिंगला कांस्यपदक मिळाले.

नवी दिल्लीतील यमुना वेलोड्रम इंदिरा गांधी स्टेडियममध्ये ही ट्रॅक सायकलिंग स्पर्धा पार पडली. सिद्धेश घोरपडेने पहिल्या दिवशी स्क्रॅचरेस इव्हेंटमध्ये सुवर्णपदक जिंकत आपल्या मोहिमेचा श्रीगणेशा केला होता. मग दुसऱ्या दिवशी त्याने ट्रॅक सायकलिंगच्या इंडिव्हिजल परशूट प्रकारात रौप्यपदकाची कमाई केली. आज त्याने पुन्हा एकदा सोनेरी यशाने मोहिमेची सांगता केली.

नव्याने उभारण्यात आलेल्या राजगीर क्रीडा संकुलात महाराष्ट्राच्या मुलींच्या संघाने दुहेरीत सुवर्ण पदक जिंकून टेबलटेनिसमधील पदकाचे खाते उघडले.महाराष्ट्रच्या काव्या भट व दिव्याश्री भौमिकने पश्चिम बंगालच्या अविशा कर्माकर व शुभाक्रिता दत्तचा ११-६, ११-९,११-७ गेमने पराभव करीत पदार्पणातच सुवर्ण यशाला गवसणी घातली. यजमान बिहार व उत्तरप्रदेश संघाला पराभूत करून काव्या -दिव्याश्री जोडीने अंतिम फेरीत मजल मारली होती.

अंतिम लढतीत डावखुऱ्या काव्या भटने जोरदार स्मॅशेस घेत सुरूवातीपासून महाराष्ट्राने आघाडी घेतली होती. दुसऱ्या गेममध्ये बंगालच्या खेळाडूंनी चिवट झुंज देण्याचा प्रयत्न केला. काव्या -दिव्याश्रीने आक्रमक खेळी करीत पदार्पणातच सुवर्णपदक जिंकण्याचा पराक्रम केला. चेन्नई येथील खेलो इंडियात काव्या तर .दिव्याश्री बेंगलोरमध्ये सराव करीत असते. खेलो इंडिया योजनेमुळे माझा खेळ उंचविला यामुळेच मी पदक विजेती ठरली असून, आता एकेरीतही मला पदक जिंकयचे असल्याचे काव्याने सांगितले.

# मध्य महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्यात पावसाचा इशारा !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०८, पुणे :** मागील काही दिवसांपासून हवामानात बदल होताना दिसतोय. राज्यातील काही भागांमध्ये पुढील पाच दिवसांसाठी अवकाळी पावसाचा इशारा देण्यात आलाय. आज मुंबईमध्येही काही भागांमध्ये पावसाने वादळी वाऱ्यासह हजेरी लावलीये. कधी पाऊस तर कधी ऊन अशी परिस्थिती संपूर्ण राज्यात आहे. भर मे महिन्यात वादळी वाऱ्यासह पाऊस पडतोय. अनेक ठिकाणी गारपिटीचा देखील इशारा देण्यात आला. विदर्भात काही शहरांमध्ये पावसाचा फटका बसतो तर काही ठिकाणी उन्हाचे चटके जाणवत आहेत. मार्च महिन्यापासूनच राज्यात अवकाळीचे सावट कायम आहे.

विदर्भासह मराठवाड्यात मुसळधार पावसाने हजेरी लावलेली असतानाच आता भारतीय हवामान खात्याने मोठा इशारा दिला आहे. राज्यात अवकाळीला पोषक वातावरण बघायला मिळतंय. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, परभणी, बीड, धाराशिव, लातूर, हिंगोली, जालना या ठिकाणी वादळी वाऱ्यासह पावसाचा इशारा देण्यात आला. मागील काही दिवसांपासून अवकाळी पाऊस मराठवाड्यात पडताना दिसतोय.

**नागपूर, चंद्रपूर, गोंदिया, भंडारा, गडचिरोलीमध्ये पुढील चार दिवस पाऊस**

मध्य महाराष्ट्रात पुढील पाच



दिवसांसाठी अवकाळी पावसाचा इशारा देण्यात आलाय. यामध्ये सांगली, सातारा, कोल्हापूरचा समावेश आहे. विदर्भातील यवतमाळ, वाशिम, अकोला, नागपूर, चंद्रपूर, गोदिंया, भंडारा, गडचिरोली आणि वर्धामध्ये पुढील चार दिवस विजांच्या कडकडाटासह पावसाचा इशारा देण्यात आलाय. थोडक्यात काय तर राज्यातील अनेक ठिकाणी अवकाळी पाऊस हजेरी लावू शकतो.

**सततच्या अवकाळी पावसामुळे पिकांचे मोठे नुकसान**

राज्यात अजूनही अवकाळी पावसाचा पोषक वातावरण असल्याचे बघायला मिळतंय. मार्च महिन्यात होळीनंतर पारा वाढण्याचे संकेत होते. मत्र, प्रत्यक्षात तसे न होता. अनेक भागात अवकाळी पावसाने सुरूवात केली. या पावसामुळे पिकांचे मोठे नुकसान झाले. नाशिकमध्ये काही दिवसांपूर्वीच गारपिट झाली आणि फळ बागांचे नुकसान झाले. पुढील काही दिवस राज्यात अवकाळीचे ढग कायम असण्याचे संकेत आहेत. जून महिन्याला सुरूवात होण्यास वेळ आहे. मात्र, त्यापूर्वीच पाऊस सुरू आहे.

# संपादकीय


## सावधान! देख ले पाकिस्तान

पाकिस्तानने नेहमीच आतंकवाद्यांच्या मदतीने भारतावर छुपे हल्ले करून शांती भंग करण्याचे काम केले व भारताच्या पाठीत खंजीर खुपसण्याचे काम केले आहे.यावर भारताने सुध्दा अनेक कारवाया सुरू पाकिस्तानला जशास तसे प्रत्युत्तर सुध्दा दिले.परंतु पहलगाममध्ये पाकिस्तानने आतंकवाद्यांच्या मदतीने २८ निरअपराध पर्यटकांचा बळी घेतला व त्यांचे सिन्दुर पुसण्याचे घृणास्पद काम केले ही सर्वात मोठी घोडचूक पाकिस्तानने करून भारतीय संस्कृतीवर हात टाकण्याचे काम केले.कारण सिन्दुर काय असते हे पाकिस्तानला माहीतच नाही.परंतु सिन्दुरमध्ये किती ताकद व हुंकार असते ही बाब भारताला,भारतीय संस्कृतीला, भारतीय मुस्लिमांसह संपूर्ण धर्माच्या लोकांना चांगल्याप्रकारे ग्यात आहे.त्यामुळे सिन्दुरची रक्षा करण्याचे दायित्व भारतीय सेनेने स्विकारले असुन संपूर्ण १४० कोटी जनाता भारतीय जवानांन सोबत उभी आहे आणि जगातील अनेक देशांसह मुख्यत्वे करून मुस्लीम देशांनी सुध्दा भारतीय कारवाईचे स्वागत केले आहे एवढी मोठी ताकद सिन्दुरमध्ये असते ही बाब पाकिस्तानने लक्षात ठेवली पाहिजे. पहलगाम हल्ला हा सरळ भारतीय संस्कृतीवर हल्ला होता.पहलगाम हल्लयामध्ये पाकिस्तानी आतंकवाद्यांनी भारतीय महिलांचे सिन्दुर पुसण्याची सर्वात मोठी चुक केली आहे.भारतीय संस्कृतीत सिन्दुरला किती महत्त्व असते ही बाब ऑपरेशन सिन्दुरने पाकिस्तानला दाखवून दिली आहे.भारताने आतापर्यंत पाकिस्तानी आतंकवाद्यांवर कारवाया केल्यात आणि अनेक आतंकवाद्यांना यमलोक सुध्दा पाठविले.परंतु ऑपरेशन सिन्दुर असा ऑपरेशन आहे की भारत, पाकिस्तानला चिडफार केल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही आणि त्याला घरात घुसून मारेल तेच काम ऑपरेशन सिन्दुरने केले.चुटकीभर सिन्दुरमध्ये किती ताकद असते ही बाब भारताने पाकिस्तानी आतंकवाद्यांचे ९ कॅम्प उध्वस्त करून दाखवून दिली आहे.भारताची ऑपरेशन सिन्दुर ही कारवाई आरपारची असल्याचे स्पष्ट दिसून येते.ऑपरेश सिन्दुर एअर स्ट्राईक अशा पध्दतीने केला की त्याची कल्पना पाकिस्तान सुध्दा करू शकत नाही.कारण भारतीय सेनेने पाकिस्तानमध्ये असलेले ९ आतंकवादी कॅम्प उध्वस्त करून जगाला एक संदेश दिला की पाकिस्तानने भारतावर जीतक्याही आतंकवाद्यां कारवाया केल्या असेल त्याचा संपूर्ण बदला भारत सरकार ऑपरेशन सिन्दुर मार्फत शेवटच्या क्षणापर्यंत घेईल हे भारताने जगाला दाखवून दिली.आता आतंकवादी कारवायांच्या बाबतीत भारत सरकार सुईच्या टोकाएवढाही समझोता करणार तर नाहीच उलट मदत करणाऱ्यांना सुध्दा सोडणार नाही ही बाब स्पष्ट झाली आहे.भारताने पाकिस्तानच्या १०० किलोमीटर हद्दीत घुसून एअर स्ट्राईक केला यात ९० पेक्षा अधिक आतंकवादी मारल्या गेल्याचे सांगितले जाते. भारत हा जगासाठी शांती दुत आहे आणि त्या पध्दतीने जगासाठी कार्य सुध्दा करीत आहे.परंतु जर कोणी भारताच्या विरूद्ध तिरप्या नजरेने जो-जो पाहिल त्याला नेस्तनाबूत केल्या जाईल ही बाब ऑपरेशन सिन्दुरने स्पष्ट करून दाखविली आहे आणि जगाने सुध्दा पाहीली.महत्वाचे म्हणजे या ऑपरेशनमध्ये आतंकवाद्यांचा टॉप कमांडर मसुर अझरच्या १० नातेवाईक मारल्या गेल्याचे सांगितले जाते.त्यामुळे सिन्दुर ऑपरेशनने पाकिस्तानला स्पष्ट संदेश दिला आहे की भारत जितका शांत आहे त्याच्या हजार पटीने अक्राळविक्राळ रूप धारण करू शकते. ऑपरेशन सिन्दुर हा पाकिस्तानसाठी फक्त ट्रेलर आहे आगे आगे होता है क्या ही बाब पाकिस्तानने व जगाने सुध्दा पाहावी.शरमेची गोष्ट म्हणजे काही दिवसांपूर्वी पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल असीम मुनीर यांनी काश्मीरचा मुद्दा उपस्थित करून आग ओकण्याचे काम केले होते.यामुळे पाकिस्तानी जनता व तेथील विरोधी पक्षसुध्दा त्यांच्या विरोधात गेले होते.त्यामुळे एवढ्या मोठ्या पदावर विराजमान असीम मुनीर यांनी केव्हा काय बोलावे हे सुध्दा यांना माहीत नाही मग हे कसे काय पाकिस्तानची रक्षा करणार.आज भारताच्या एअर स्ट्राईकमुळे पाकिस्तानी जनता अमीम मुनीर ला व पाकिस्तान सरकारला कोसत आहे.पाकिस्तान अब भी वक्त सुधरजा नहीं तो तेरा अंत निश्चित है.पाकिस्तानला त्याची जागा दाखविण्याकरीता भारत सरकार एअर स्ट्राईक करीत आहेच.परंतु त्याला नेस्तनाबूत करण्यासाठी संपूर्ण भारतभर मॉक ड्रिलला सुध्दा सुरूवात झाली आहे म्हणजेच ही पाकिस्तान सोबतची आरपारची लढाई आहे.कारण पाकिस्तानचा पापाचा घडा संपूर्णपणे भरलेला आहे.

**जय हिंद!**

# बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचवणारे आधुनिक भगीरथ : कर्मवीर भाऊराव पाटील

बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचवणारे आधुनिक काळातील भगीरथ रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांची आज पुण्यतिथी. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा जन्म कोल्हापूर जिल्ह्यातील कुंभोज या गावी २२ सप्टेंबर १८८७ रोजी झाला. सांगली जिल्ह्यातील ऐतवडे हे त्यांचे मूळ गाव होय. कर्मवीर भाऊराव पाटील हे लहानपणापासूनच बंडखोर प्रवृत्तीचे होते. तत्कालीन जातीव्यवस्थेत उच्च जातींकडून कनिष्ठ जातींवर होणाऱ्या अन्यायाची त्यांना खूप चीड होती. अस्पृश्यतेबद्दल त्यांच्या मनात प्रचंड राग होता. अस्पृश्य समाजाला उच्च वर्णीयांकडून जी वागणूक दिली जात होती त्याबाबत त्यांच्याम नात प्रचंड असंतोष होता. अस्पृश्य समाजाला विहिरीचे पाणी दिले जात नाही हे पाहून त्यांनी विहिरीचे रहाटच तोडून टाकले होते. कर्मवीर भाऊराव पाटलांना शिक्षणाची खूप आवड होती. त्यांचे प्राथमिक शिक्षण कोल्हापूर जिल्ह्यातील विटा या गावी झाले तर माध्यमिक शिक्षण कोल्हापूरच्या राजाराम हायस्कूलमध्ये झाले. शालेय वयातच त्यांच्यावर छत्रपती शाहू म हाराजांच्या विचारांचा प्रभाव पडला. छत्रपती शाहू महाराज व महात्मा ज्योतिराव फुले यांना ते आदर्श मानू लागले. शिक्षण पूर्ण झाल्यावर ते साताऱ्यात गेले तीथे त्यांनी गरीब मुलांसाठी शिकवण्या सुरू केल्या. याच काळात त्यांनी मद्गना मास्तर, भाऊसाहेब कुदळे, नानासाहेब येडेकर यांच्या मदतीने दुधगावत दुधगाव शिक्षण मंडळाची स्थापना केली. या संस्थेमार्फत गरीब मुलांसाठी एक वसतिगृह सुरू केले. ४ ऑक्टोबर १९१९रोजी कर्मवीरांनी सातारा जिल्ह्यातील काले गावात रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. बहुजन समाजातील मुलांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करून त्यांना मोफत व दर्जेदार शिक्षण देणे हे रयत शिक्षण संस्थेचे मुख्य उद्दिष्ट होते. बहुजन समाजातील गरीब मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी अपार कष्ट घेतले. बहुजन समाजातील मुलांना केवळ पुस्तकी शिक्षण न देता त्यांनी त्यांना सम ता, बंधुता, श्रमप्रतिष्ठा, सामाजिक बांधिलकी आदी मूल्यांची देखील शिकवण दिली. संस्थेत शिक्षण घेणाऱ्या मुलांना साताऱ्यात राहण्याची सोय व्हावी म्हणून त्यांनी वसतिगृह बांधले. या वसतिगृहाची जबाबदारी त्यांनी पत्नी लक्ष्मीबाई यांच्यावर सोपवली. लक्ष्मीबाई या वसतिगृहातील मुलांसाठी मायेची सावली बनल्या. वसतिगृह चालवण्यासाठी त्यांना आपले दागिने विकावे लागले. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत संस्था आणि वसतिगृह चालवण्याचा प्रयोग कर्मवीरांना करता आला तो लक्ष्मीबाई यांच्यामुळेच. कर्मवीरांनी रयत शिक्षण संस्थेत कमवा आणि



शिका योजना सुरू केली. या योजनेनुसार चालणारे पहिले फ्री अँड रेसिडेंशल हायस्कूल सातारा येथे सुरू करून त्या हायस्कूलला म हाराजा सयाजीराव गायकवाड यांचे नाव दिले. त्यानंतर याच नावाने त्यांनी अनेक शाळा काढल्या. १९४७ साली कर्मवीरांनी साताऱ्यात छत्रपती शिवाजी कॉलेज, तर १९५४ साली कराड येथे सद्गुरु गाडगे महाराज कॉलेजची स्थापना केली. आपल्या संस्थेत प्रशिक्षित शिक्षकांचा वानवा पडू नये यासाठी त्यांनी अध्यापक विद्यालये देखील सुरू केली. भाऊराव पाटील यांच्या हयातीत रयत शिक्षण संस्थेने ५७८ प्राथमिक शाळा, ४३९ माध्यमिक शाळा, ( २७ मुलींसाठी ) ३८ वसतिगृह शाळा, १६० उच्च माध्यमिक विद्यालये, २१ तंत्रदान विद्यालये, ८ अध्यापक विद्यालये, ( १ मुलींसाठी ) ४१ महाविद्यालये (४ मुलींसाठी ) आणि ५ इंग्रजी माध्यमांची विद्यालये यांची स्थापना केली. रयत शिक्षण संस्थेचा विस्तार महाराष्ट्रातच नाही तर कर्नाटकातही झालेला आहे. त्यांनी लावलेल्या रयत शिक्षण संस्थेचा आज वटवृक्ष बनला आहे. बहुजन वर्गातील मुलांसाठी त्यांनी केलेले कार्य पाहून पुणे विद्यापीठाने १९५९ साली त्यांना डि. लीट ही मानाची पदवी बहाल केली. भारत सरकारनेही पद्मभूषण हा मानाचा पुरस्कार देऊन त्यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव केला. बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचवणाऱ्या या आधुनिक भगिरथाचे ९ मे १९५९ रोजी निधन झाले. आज त्यांची पुण्यतिथी. आजच्या दिवशी त्यांचे स्मरण करून त्यांना अभिवादन करणे हे बहुजनांचे आद्य कर्तव्य आहे.

**कर्मवीर भाऊराव पाटलांना विनम्र अभिवादन!**

**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# तूर खरेदीसाठी १५ दिवसाची मुदतवाढ मिळावी केंद्र सरकारकडे मागणी

**अक्षराज : वृत्तसंकलन**


**दि.०८,** राज्यातील तूर उत्पादक शेतकरी व लोकप्रतिनिधी यांची मागणी लक्षात घेता नाफेड व एनसीसीएफ यांच्या माध्यमातून सुरू असलेल्या तूर खरेदीची मुदत १५ दिवसांनी वाढवून मिळावी, अशी मागणी पणन मंत्री जयकुमार रावल यांनी केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाकडे केली आहे. तसा प्रस्ताव पणन विभागाच्या माध्यमातून केंद्राला पाठवण्यात आला आहे.राज्यात १ लाख ३७ हजार ४५८ शेतकऱ्यांची तूर खरेदीसाठी ऑनलाईन नोंदणी झालेली असून त्यापैकी ५२ हजार ९७१ शेतकऱ्यांकडून ७७ हजार ५३ मेट्रिक टन तूर खरेदी करण्यात आलेली आहे. केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनेनुसार खरेदी प्रक्रियेसाठी ९० दिवसांची मुदत १३ मे २०२५ रोजी संपत आहे.

उर्वरित नोंदणीकृत शेतकऱ्यांची तूर हमीभावाने खरेदी होण्यासाठी मुदतवाढ मिळावी, अशी मागणी आहे. ही मागणी लक्षात घेता १३ मे २०२५ पासून पुढे पंधरा दिवसाची मुदतवाढ केंद्र सरकारने वाढवून द्यावी, अशी विनंती पणन मंत्री जयकुमार रावल यांनी केंद्र सरकारकडे केली आहे.

# 'मूळव्याध' मध्ये वापरली जाणारी काही आयुर्वेदिक औषधी !

आयुर्वेदिक उपाय हे आजारांना मूळातून बरे करतात. सोबतच त्यांना गंभीर अवस्थे मध्ये जाण्या पासून सुद्धा वाचवतात. परंतु किती प्रमाण मध्ये आजार हा वाढलेला आहे त्याची तीव्रता किती आहे यावर ते अवलंबून असते. आजार जर असह्य आहे आणि तो औषधी मुळे बरा होऊ शकत नसेल तर तिथे शस्त्रक्रिया करणे हाच एक उपाय असतो ! म्हणून असे काही उपाय सदर लेखात आपण बघू जे तुम्ही घरी सुद्धा करू शकता !

एका मातीच्या भांड्या मध्ये आवळा रात्री भिजू घालून ठेवा आणि सकाळी ते पाणी गाळून त्यात थोड्या प्रमाणात मि श्री (साखर) टाकून त्याला उपाशी पोटी घेतले तर तुमचे विबंध सारखी समस्या दूर होते आणि मल साफ होण्यास मदत



होते. त्यानंतर सूर्यफुलाच्या बियांची अर्धा चमचा पावडर मिश्री मध्ये मिसळून उपाशी पोटी घेतल्याने रक्तस्रावचा त्रास कमी होतो. लसूण गुणांनी उष्ण असला तरी याचे मूळव्याधी मध्ये उत्तम असे फायदे आहे. यामध्ये अँटी इन्फ्लॅमेटरी व अँटी मायक्रोबियअल कंपाऊंड आहेत ते रक्तगाठी तयार होण्या पासून थांबवतात. याचे रोजच्या जेवणात सेवन करायला पाहिजे. एक आपल्या ओळखीची वनस्पती म्हणजे कोरफड ज्याला अलोव्हेरा म्हणून ओळखल्या जाते. ही खूप गुणकारी औषधी आहे. याम ध्ये सुद्धा अँटी इन्फ्लॅमेटरी गुण आहेत तसेच हे शीत आहे याचे सेवन केल्याने विबंध, सुजन रक्ततस्राव आणि पोटात होणारी जळजळ थांबण्यास मदत होते. या सगळ्या वरील औषधी आपल्याला सहज उपलब्ध होऊन जातात. तर असे काही उपाय जर १-२ महिने जर तुम्ही करत असाल तर नक्कीच तुम्हाला फायदा होईल.

**डॉ.तेजश्री वामनराव बनसोड**
**(एम. एस शल्यतंत्र)**

## युध्द...

तयारी हवी सर्वंकष
पुकारतो जेंव्हा युध्द
साथ देती अन्य देश
उद्देश असावेत शुध्द

अंकुश नुरतो हातात
एकदाओलांडता हद्द
अंतर्बाह्य सैन्यदल ते
व्हावेलागे स्वयंसिद्ध

सीमापार हवे विचार
नसे आत्मघाती जिद्द
कणखर कठोर रास्त
निर्णय विजयी सिध्द

रंध्रात भरे होश जोश
बिगुल न केवळ वाद्य
सिव्हिलियनचीसुरक्षा
कर्तव्यनागरीक आद्य

वानवा ना अन्नधान्या
कोठारे सुसंपन्नखाद्य
गाफील शत्रू सैनिका
मदमस्त पिऊ दे मद्य

युध्दात होरपळे जाई
हर एक आबाल वृध्द
दूरगामी परिणामघडे
प्रगतिगति होते विध्द

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# जीवन गाणे गातच रहावे...

जीवन गाणे गातच रहावे. झाले गेले विसरून जावे, पुढे पुढे चालावे,जीवन गाणे गातच रहावे...

हो, हे खरं आहे की जीवन म्हणजे एखाद्या गाण्याच्या गोड लकेरीसारखे असते. ज्याप्रमाणे आपण ताल,सूर,लय यांचा सम तोल साधून गाणं म्हणण्याची कला आत्मसात करतो, त्याचप्रमाणे जीवन जगता आले तर, जगण्यात खूप मजा येते. जीवन हे नदीसारखे प्रवाही असतं . ते थांबू शकत नाही.घेतलेला श्वास पुन्हा येत नाही; गेलेला क्षण पुन्हा आयुष्यात कधीच परत येत नाही. म्हणून प्रत्येक क्षणात तन-मनाने सक्रिय सहभाग घेतला, तर जीवनातील प्रत्येक क्षणाचा गोडवा अनुभवता येतो.

एकाच वेळी आपण सर्वांना खूश ठेवू शकत नाही, हे कायम लक्षात घेतले पाहिजे. एकाला खूश करताना दुसरा नाराज होतो, आणि त्याला समजावताना पहिला पुन्हा नाराज होतो, अशी विचित्र अवस्था अनेकदा अनुभवास येते. सकाळी जो आपल्यावर खूश असतो तो संध्याकाळी नाराज होतो, तर सकाळी नाराज असलेला संध्याकाळी आपल्यावर खूश होतो. म्हणूनच आपण आपल्या धुंदीत जीवन जगले पाहिजे ˉ मनात कोणतेही कपट, क्लेश, किंतु-परंतु न ठेवता, स्वच्छ, पारदर्शक राहिले पाहिजे.

कोणाविषयी वाईट बोलायचे नाही, कोणाविषयी वाईट विचार करायचा नाही, आणि कोणाच्याही नुकसानासाठी कटकारस्थान रचायचे नाही. दुसऱ्याच्या आयुष्यात डोकावू नये. शक्य तितका आपल्यातील काम, क्रोध, लोभ, मद, मत्सर, माया ˉ या षड्रिपूंवर विजय मिळवण्याचा प्रयत्न करावा. मग पहा, जीवन जगण्यात किती आनंद मिळतो!

जगभराची चिंता स्वतः करत बसू नये, कारण चिंता ही चितेपेक्षा अधिक दाहक असते. चिता शरीर जाळते, पण चिंता माणसाला आतून जाळते. जो भी होगा, देखा जायेगा! हा निर्धार डोळ्यासमोर ठेवून येणाऱ्या क्षणाला, दिवसाला, व्यक्तीला आणि परिस्थितीला सामोरे गेले पाहिजे.

स्वच्छंदी, बेधडक आणि शेवटच्या ओव्हरमध्ये फोर-सिक्स मारणाऱ्या फलंदाजासारखे 'आऊट तर आऊट' ˉ अशा जिद्दीने हे जीवन जगले, तर किती मजा येते ते अनुभवून बघा. मन मारून जगण्यापेक्षा मनाला वाटेल तसे, पण नैतिकतेच्या चौकटीत राहून, बिनधास्त जगणे हाच मस्त मजेत जगण्याचा खात्रीशीर मार्ग आहे.

**रूमीच्या कवितेत सांगितल्याप्रमाणे :**

ज़िंदगी मेरी बयां हो बस तीन बातों में,
मैं कच्चा था, पकाया गया, मुकाम तक पहुँचाया गया...

कच्च्यापासून पक्क्यापर्यंतचा प्रवास प्रत्येकाचा होतच असतो. त्यासाठी मित्र, जवळचे नातेवाईक आणि शैक्षणिक व आध्यात्मिक गुरु यांचे सहकार्य आणि मार्गदर्शन आवश्यक असते. यासाठी आत्म विश्वास वाढवणारे लोक आपल्या आसपास ठेवले पाहिजेत. आपले खच्चीकरण करणारे, तोंडावर गोड बोलणारे, पण मागे निंदा करणारे लोक शक्य तितके टाळावेत. पण त्याच वेळी हेही लक्षात घेतले पाहिजे की लोक म्हणतात, चांगली माणसे जोडा आणि वाईट तोडा, पण तथागत गौतम बुद्ध म्हणतात, माणसातले चांगले शोधा आणि वाईट दुर्लक्षित करा, कारण कोणीही सर्वगुणसंपन्न नसतो.

प्रत्येक माणसातील चांगुलपणा शोधण्याचा प्रयत्न सतत करत राहिलो, तर जीवनाचे गाणे सुरेल स्वरात गायले जाईल...! कोणत्याही प्रकारची हाव, अपेक्षा किंवा कोणाशीही स्पर्धा न करता पुढे गेलो तर जीवनाचं गाणं मधुर आवाजात गुणगुणता येईल. प्रत्येक माणसातील चांगुलपणा शोधणे, हे काम अवघड जरी असलं,तरी ते करण्यात देखील एक वेगळी मजा आहे. माणसं जोडली पाहिजेत. त्यांच्या वेगवेगळ्या वृत्ती प्रवृत्ती पाहिल्या पाहिजेत. जगण्याच्या प्रत्येकाच्या वेगवेगळ्या पद्धतीचे विश्लेषण करता आलं पाहिजे. भेटणाऱ्या व्यक्तींचा वैचारिक पाया शोधता आला पाहिजे.त्यांच्या मनातील कल्पना-कुकल्पना, मत- मतांतर, निती-अनिती, सदाचार -दुराचार याबद्दल त्यांचा असलेला दुराग्रह ओळखता आला पाहिजे. त्यांच्याशी वैचारिक वादविवाद करून त्यांना जिंकता आलं पाहिजे. दुसऱ्यातील चांगुलपणा तुम्हाला सापडत गेला, तर तुमचं जीवन गाणं सुरेल आणि सुमधूर नक्कीच बनेल.

**- किशोर जाधव सोलापूर**
**- मो. नं. ९९२२८८२५४१**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## अस्मिता संस्थेचा ' सुवर्ण 'महोत्सवी कार्यक्रम...




**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०७, मुंबई :** जोगेश्वरी पूर्व येथील अस्मिता सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक संस्थेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षांनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक १ मे १९७६ रोजी जोगेश्वरी पूर्व येथे लावले गेले. दिनांक १ मे २०२५ रोजी कार्यक्रमाची सुरुवातीला संस्थेचे विद्यमान अध्यक्ष शेखर पारखी, सरचिटणीस राजन चाचड, विवेक अग्रवाल, रवी नथानी यांच्या शुभहस्ते द्वीप प्रज्वलन करण्यात आले.यावेळी माजी मुख्याध्यापक दिलीप माने, जॉय ऑफ गिविंग चे संस्थापक अध्यक्ष गणेश हिरवे यांचा विशेष सन्मान करण्यात आला.समाजासाठी माझे काय योगदान असू शकते तसेच काय काय चांगले काम करता येईल यावर उपस्थितांपैकी अनेकांनी प्रतिक्रिया मांडल्या.संस्थे तर्फे चालवण्यात येणाऱ्या अस्थिव्यंग्य चिकित्सा व पुनर्वसन केंद्र, कौन्सिलिंग सेन्टर, कौशल्य विकास केंद्र, शिशू विकास केंद्र, प्राथमिक आणि माध्यमिक विद्यालय इत्यादी विभागाच्या वर्षभराच्या कार्याचा आढावा उपस्थिता समोर मांडण्यात आला.संस्थेच्या स्थापने पासून मोलाचे योगदान देणाऱ्या सर्वश्री दादा घैसास, विष्णू गणेश पटवर्धन उर्फ दादा पटवर्धन, डॉ नाथानी, रमेश चिकोर्डे, जगदीश सामंत व नाना बारसोडे या तपस्वी कार्यकर्त्यांचा विशेष उल्लेख करण्यात आला.सुवर्ण महोत्सवी वर्षात अस्मिता संस्था समाज उपयोगी विविध उपक्रम नव्याने साजरे करणार आहे.अस्मिता एक नावाजलेली संस्था म्हणून मुंबई महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे.संस्कृतिक क्षेत्रातही संस्थेने मोलाचे कार्य केले आहे. मराठी नाट्यमहोत्सव, विविध सामाजिक विषयावरील व्याख्यान्माला, महाराष्ट्राव्यापी काव्यस्पर्धा व विविध साहित्य विषयक उपक्रम, युवकांसाठी उत्स्फूर्त वक्तृत्व स्पर्धा, रक्तदान शिबीर इ अनेक कार्यक्रम अस्मिता संस्था सातत्याने करीत असते.गेल्या पन्नास वर्षात अस्मिता संस्थेला अनेक पुरस्कार मिळालेले असून अस्मिता संस्थे मधून अनेक दिव्यांग स्वतःच्या पायावर उभे राहिले आहेत, तसेच अस्मिता संचालीत विद्यालयातून शिकलेले अनेक विधार्थी देशात आणि परदेशात विविध मोठ्या पदांवर काम करीत आहेत याचा सर्वांना अभिमान आहे.सुवर्ण महोत्सवाचे सर्वांनीच स्वागत केलं असून अनेकांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

## विंग गावामध्ये घनकचरा व सांडपाणी प्रकल्प कौतुकास्पद - अर्चना वाघमळे



**अक्षराज : सुहास महांगरे**

**दि.८, विंग (खंडाळा) :** ग्रामपंचायत विंग ता.खंडाळा.जि.सातारा येथे आज आर. आर. आबा पाटील स्वच्छ व सुंदर गाव पाहणी करण्यासाठी सातारा जिल्हा परिषद च्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं) अर्चना वाघमळे यांनी घनकचरा व सांडपाणी कामाची व विविध विकास कामाची पाहणी केली. तसेच विंग गावामध्ये एस टी पी प्लांट त्यामध्ये विंग गावातील ९०% गटरातील सांडपाणी येते तरी एस टी पी प्लांटची ५०,००० लिटर इतकी क्षमता प्रति दिवसाला आहे. तरी सुरुवातीच्या २ टाक्या १० हजार त्यानंतर वरच्या ३ टाक्या २५,००० लिटर तरी शेवटची टाकी त्या ठिकाणी पूर्ण पाणीपुरवठा साठा केला जातो १५,००० लिटरचे आहे असे मिळून एकूण ५०,००० लिटर प्रति दिवस क्षमतेचा प्रकल्प आहे. सातारा जिल्हा परिषद च्याउपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं) अर्चना वाघमळे यांनी सांडपाणी प्रकल्पाचे कौतुक केले. तसेच गावातील तरुण मुलांना जीम ग्रामपंचायतने ग्रामनिधी मधून दिलेली आहे त्याची पाहाणी केली. गावातील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाची पाहणी केली. गावातील सर्व नळांना वॉटर मीटर बसलेले आहेतगावातील ग्रामस्थांना व लहान मुलांना नाना नानी पार्क आहे त्याची पाहाणी केली जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा विंग व अंगणवाडी शाळेला भेट दिली तसेच बचत गटाच्या महिला यांनी विविध प्रकारच्या वस्तू ची माहिती दिली. अर्चना वाघमळ यांच्या समवेत पंचायत समिती खंडाळा गटविकास अधिकारी वर्ग -१ अनिल वाघमारे, संदिप दीक्षित पंचायत समिती विस्तार अधिकारी सातारा, विस्तार अधिकारी बोडरे, एकात्मिक बाल विकास प्रकल्पाच्या अधिकारी काळे मॅडम, पंचायत समिती खंडाळा चे बांधकाम विभाग अधिकारी पाणी पुरवठा अधिकारी आरोग्य विभाग अधिकारी, विंग गावचे सरपंच स्वप्निल तळेकर, उपसरपंच पूनम तळेकर सर्व सदस्य, ग्रामविकास अधिकारी पडळकर, बीआरसी अतुल गायकवाड, सीमा गायकवाड, जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा विंग च्या मुख्याध्यापक वंजारी मॅडम त्यांच्या सहकारी उषा यादव, शिल्पा ननावरे, विंग गावातील ग्रामस्थ उपस्थित होते. सर्व शासकीय अधिकारी अंगणवाडी सेविका व मदतनीस बचत गटाच्या शितल महांगरे व बचत गटाच्या महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पनवेल मनपा अग्निशमन दलाकडून यशस्वी मॉक ड्रिल

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०८, पनवेल :** आपत्ती काळात नागरिकांना योग्य त्या सूचना मिळाव्यात आणि ते सुरक्षित रहावेत याकरिता मॉकड्रिल चे आयोजन करण्यात येते. मॉकड्रिल संदर्भातील सूचनेनुसार आज पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयात अग्निशमन विभागामार्फत मॉकड्रिल चे आयोजन करण्यात आले.

सायंकाळी ४ वाजता अग्निशमन दलाची गाडी सायरन वाजवत महानगर पालिकेच्या प्रवेश द्वाराजवळ उभी राहिली आणि बिल्डिंगला आग लागली आहे तातडीने बिल्डिंग खाली करावी. अशा सूचना देत संपूर्ण इमारत रिकामी केली.

इमारतीच्या बाहेर सर्वजण जमा झाल्यानंतर अग्निशमन विभागाच्या वतीने उपस्थितांना आपत्ती काळात काय करावे ? काय करू नये ? याबाबतचे सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. छोटे अग्निशमन यंत्र ज्याला फायर एक्स्टेंग्विशर किंवा बाटला असे म्हणतात. त्याचा वापर कसा करावा याचेही प्रात्यक्षिक करून दाखवण्यात आले. यावेळी अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, डॉ. वैभव विधाते, स्वरूप खारगे, मुख्या लेखा वित्त अधिकारी मंगेश गावडे, लेखाधिकारी संग्राम व्होरकाटे, शहर अभियंता संजय कटेकर, डॉ. भगवान गीते, डॉ. मधुलिका लाड, तसेच महानगरपालिकेचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

## महाराष्ट्राचा रिलेमध्ये सुवर्ण धमाका ; जलतरणात जिंकली चार पदके



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०८, गया :** महाराष्ट्राच्या जलतरणपटूंनी सलग तिसर्या दिवशी ७व्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत पदकांची लयलूट केली. महाराष्ट्राने मुलांच्या ४ बाय मेडले रिले स्पर्धेत सुवर्णपदकाचा धमाका केला. याचबरोबर धरीती अहिरवालने रौप्य, तर वेदान्त तांदळे व अलेफिया धंसुरा यांनी कांस्यपदके जिंकली. गया शहरातील 'बीआयपीएआरडी'च्या जलतरणात तलावावर सुरू असलेल्या या स्पर्धेत अर्नव कडू, शुभम जोशी, वेदांत तांदळे व अथर्व संकपाळ या चौकडीने मुलांच्या ४ बाय मेडले रिले स्पर्धेत ३ मिनिटे ५७.८९ सेंकद वेळेसह सुवर्णपदकाला गवसणी घातली. कर्नाटकच्या संघाने ३ मिनिटे ५९.०५ सेंकद वेळेसह रौप्य, तर आंध्र प्रदेशच्या संघाने ४ मिनिटे ०२.५८ सेंकद वेळेसह कांस्यपदक जिंकले. मुलींच्या ४०० मीटर मेडले प्रकारात महाराष्ट्राच्या धरिती अहिरवाल हिने ४ मिनिटे २०.६० सेंकद वेळेसह रौप्यपदकाची कमाई केली. तमिळनाडूच्या श्रीनिथी नटेसन हिने ५ मिनिटे १७.५७ सेंकद वेळेसह सुवर्णपदकावर मोहर उमटवली, तर तेलंगणाची श्री निथया सागी ५ मिनिटे २०.८१ सेंकद वेळेसह कांस्यपदकाची मानकरी ठरली. याचबरोबर मुलींच्या १०० मीटर फ्रिस्टाईल प्रकारात महाराष्ट्राच्या अलेफिया धंसुरा हिने ५९.७४ सेंकद वेळेसह कांस्यपदक जिंकले. कर्नाटकची ऋजुला एस. हिने ५९.२९ सेंकद वेळेसह सुवर्ण, तर दिल्लीच्या तितिक्षा रावलने ५९.४८ सेंकद वेळेसह रौप्यपदक जिंकले.

मुलांच्या १०० मीटर बटरफ्लाय प्रकारात महाराष्ट्राच्या वेदान्त तांदळेला ५६.२९ सेंकद वेळेसह कांस्यपदक मिळाले. आसामचा जानंजॉय हझरिका ५५.५२ सेंकद वेळेसह सुवर्णपदकाचा मानकरी ठरला, तर कर्नाटकच्या चिंतन शेट्टीला ५६.१४ सेंकद वेळेसह रौप्यपदक मिळाले.

## नेमबाजीच्या ५० मीटर थ्री पोझीशनमध्ये साधला अचूक निशाणा

### प्राची गायकवाड, वेदान्त वाघमारेचा 'सुवर्ण' वेध...



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०८, नवी दिल्ली :** वेदान्त वाघमारे आणि प्राची गायवाड या महाराष्ट्राच्या खेळाडूंनी ७व्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत नेमबाजीच्या ५० मीटर थ्री पोझीशन रायफल प्रकारात अचूक निशाणा साधताना सुवर्णपदकाला गवसणी घातली. खेलो इंडियाच्या इतिहासात ५० मीटर थ्री पोझीशन प्रकारात पदक जिंकणारा वेदान्त वाघमारे हा पहिला नेमबाज ठरला. त्यामुळे महाराष्ट्रासाठी हे ऐतिहासिक पदक ठरले.

नवी दिल्लीतील डॉ. कर्णी सिंग शुटींग रेंजवर महाराष्ट्रासाठी बुधवारी सोनियाचा दिवस ठरला. नेवाश्यासारख्या (जि. अहिल्यानगर) ग्रामिण भागातील वेदान्त वाघमारेने ५० मीटर थ्री पोझीशन रायफल प्रकारात मुलांच्या विभागात ४५२.५ गुणांची कमाई करीत सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. हरयाणाचा रोहित कन्यान ४५१.९ गुणांसह रौप्यपदकाचा मानकरी ठरला. पंजाबच्या अमितोज सिंगला ४४०.१ गुणांसह कांस्यपदक मिळाले. नेवासा फाट्यावरील त्रिमूर्ती कॉलेजमध्ये शिकणारा वेदान्त वाघमारे सध्या पुण्यातील बालेवाडी येथे किरण खंदारे व बिबासवान गांगुली यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करतो. त्याला तिसर्या प्रयत्नात खेलो इंडिया स्पर्धेत पदकाला गवसणी घालण्यात यश मिळाले. याआधीच्या दोन्ही स्पर्धेत वेदान्तने अंतिम फेरी गाठली होती. मात्र, दोन्ही वेळेस त्याला पदकाने हुलकाणी दिली होती. तिसर्या प्रयत्नात अखेर त्याचे पदक जिंकण्याचे स्वप्न सत्यात उतरले.

'खेलो इंडिया युवा स्पर्धेत नेमबाजीतील मुलांच्या ५० मीटर थ्री पोझीशन रायफल प्रकारात आतापर्यंत महाराष्ट्राला एकही पदक नव्हते. अखेर स्पर्धेच्या सातव्या पर्वात मी महाराष्ट्राला सुवर्णपदक जिंकून देण्यात यशस्वी ठरलो, त्यामुळे सहाजिकच आनंद झालाय. त्रिमूर्ती कॉलेजकडून सरावासाठी मिळालेली मोकळीक. वडीलांचे (नितीन वाघमारे) यांचे पाठबळ आणि सर्व मार्गदर्शक आणि महाराष्ट्र शूटिंग टीमचे व्यवस्थापक यांच्या मदतीच्या जोरावर मला हे सोनेरी यश मिळाले, अशी माझी भावना आहे.'

मुंबईच्या प्राची गायकवाड हिने ५० मीटर थ्री पोझीशन रायफल प्रकारात मुलींच्या विभागात ४५८.४ गुणांची कमाई करीत सुवर्णपदकाला गवसणी घातली. कर्नाटकच्या टिलोट्टमा सेन हिला ४५५.६ गुणांसह रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. तिचीच राज्यसहकारी अनुष्का ठोकुर हिने ४४५.७ गुणांसह कांस्यपदक जिंकले. माटूंगा येथील गुरूनानक खालसा कॉलेजची विद्यार्थींनी असलेली मुंबईची प्राची गायकवाड ही अरूण वारेशी व बिबासवान गांगुली यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करते. खेलो इंडिया स्पेर्धेतील तिचे हे दुसरे पदक होय. गत चेन्नईतील स्पर्धेत प्राचीला कांस्यपदक मिळाले होते. यावेळी तिने आपल्या पदकाचा रंग हा सोनेरी करून दाखविला.

## धाराशिव येथे मिशन सिंदुर कामयाबचा जल्लोष...

**अक्षराज : विकास वाघ**

**दि.०७, धाराशिव :** बाप तो बाप रहेगा नापाक पाकविरोधात आज भारतीय वायू सेनेने एयर स्ट्राइक करून पाकिस्तानातील नऊ दहशतवादी तळावर हल्ला करून दहशतवादी स्थळे निस्तनाबूत करून अनेक दहशतवाद्यांना कंठस्नान घातले.

दहशतवाद्यांनी भारतीय पर्यटकावर जो भ्याड हल्ला केला होता त्याचा बदला घेतला देशाचे कणखर मा. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी, मा. केंद्रीय गृहमंत्री अमित शहाजी, आणि मा. संरक्षण मंत्री राजनाथ सिंहजी यांच्या नेतृत्वाखाली नव्या भारताने दहशतवाद्यांना आणि त्यांना पाठिंबा देणाऱ्या पाकिस्तानलाही आपल्या सामर्थ्याची स्पष्ट झलक दाखविली आहे.

मा. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी दिलेला इशारा मिट्टी मे मिला देंगे आज भारतीय सशस्त्र दलाने सत्यात उतरवला. बहावलपूर, मुरीदके, सियालकोट आणि पाकव्याप्त काश्मीर मधील दहशवादी तळ उध्वस्त करण्यात आले.

पहलगाम मधील दहशतवादी हल्ल्याचे हे ठोस आणि निर्णयक उत्तर आहे. यापुढे जर कोणत्याही भारत विरोधी शक्तीने भारत विरोधी कारवाई केल्यास जशास तसे उत्तर दिले जाईल हा संदेश या कारवाईतून दिलेला आहे, याचा आम्हा सर्व भारतीयांना अभिमान आहे.

छत्रपती शिवाजी महाराज चौकात उपस्थित राहून जल्लोष केला. फटाके फोडून भारतीय सशत्र दलाच्या समर्थनार्थ घोषणा देऊन उत्साह वाढवण्याचा प्रयत्न केला यावेळी उपस्थित नितीन काळे, राजसिंहा राजेनिंबाळकर, अभय इंगळे, युवराज नळे, अमित शिंदे, प्रवीण पाठक, प्रल्हाद धतुरे, लक्ष्मण माने, दर्शन कोळगे, राहुल काकडे, अमोलराजे निंबाळकर, दाजी पवार, अभिजीत काकडे, अक्षय ढोबळे, सुजित साळुंके, रोहित देशमुख, सुनील पंगुडवाले, मेसा जानराव, पुष्पकांत माळाळे, नरेन वाघमारे, आकाश तावडे, किशोर पवार, गणेश इंगळगी, चैतन्य माने, नवनाथ सोलंकर, प्रशांत सावंत, अभिजीत पतंगे, अजिंक्य मुंडे, उमेश चव्हाण, उदय देशमुख, अभिषेक पवार, ओंकार बांगर, विकास पवार, आदित्य किरदत्त,सागर पवार, प्रमोद बचाटे.



## कळव्यातील ७ माजी नगरसेवकांचा एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०८, कळवा (ठाणे) :** ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील आणी कल्याण लोकसभा मतदार संघातील कळवा, खारेगाव, विटावा विभागातील राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाच्या माजी नगरसेवकांनी आज एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.

यामधे प्रामुख्याने ठाणे महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेते मिलिंद पाटील, माजी नगरसेविका मनाली पाटील, माजी नगरसेवक महेश साळवी, माजी नगरसेविका मनीषा साळवी,माजी नगरसेविका आणी ठाणे महिला राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या कार्याध्यक्षा सुरेखा पाटील, माजी नगरसेवक सचिन म्हात्रे,माजी नगरसेविका प्रमिलाताई केणी,युवक नेतृत्व मंदार केणी यांनी राष्ट्रवादी पक्षाशी फारकत घेत शिवसेनेचा भगवा झेंडा हाती घेऊन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत पक्ष प्रवेश केला.

यावेळी शिवसेना खासदार नरेश म्हस्के,शिवसेना सचिव राम रेपाळे उपस्थित होते. नगरसेवकांच्या या पक्ष प्रवेशाने आधीच भक्कम असलेली शिंदेची शिवसेना अधिकच मजबूत झाली असून शरद पवार गटाच्या राष्ट्रवादी पक्षाला मात्र ठाण्यात खिंडार पडले आहे. शरद पवार गटाचे कळवा मुंब्रा विभागाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांच्यासाठी देखील हा खुप मोठा धक्का आहे.



दरम्यान ठाणे जिल्ह्यातील अनेक तालुक्यामधून दररोज विविध पक्षांचे शेकडो पदाधिकारी आणी कार्यकर्ते शिंदेच्या शिवसेनेत प्रवेश करीतच आहेत. ठाणे जिल्हा हा मुळात धर्मवीर आनंद दिघे आणी शिवसेनेचा बालेकिल्ला राहिला आहे. ठाणे महानगर पालिकेतील तब्बल ७८ नगरसेवक शिवसेने सोबत आहेत.निवडणुका डोळ्यासमोर ठेवून शिवसेना पक्ष कधीच काम करीत नाही. शिवसेनेचे काम हे बाराही महिने आणी ३६५ दिवस सुरूच असते.याचा अनुभव जनतेने मागील काही वर्षात अनुभवलाय. त्यामुळेच एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून विविध पक्षातील प्रतिनिधी शिवसेनेत प्रवेश करीत आहेत,असा दावा शिंदेच्या शिवसेना नेत्यांनी केला आहे.

काही दिवसापूर्वीच सर्वोच्य न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका संदर्भात एक मोठा निर्णय दिला आहे. पुढील चार महिन्यात महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यात याव्यात आणी याबाबतची अधिसूचना येत्या चार आठवड्यात काढावी, असा निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे.

अशातच आता राज्यात सर्वच राजकीय पक्षांनी कंबर कसली असून सर्वच पक्ष पदाधिकारी, आणी कार्यकर्ते कामाला लागले आहेत. याच पार्शवभूमीवर काळव्यातील नगरसेवकांच्या या पक्ष प्रवेशाला मोठे महत्व आले आहे.या पक्षांतरा बाबत बोलताना ठाणे पालिकेतील माजी विरोधी पक्षनेते कळव्यातील कार्यसम्राट नगरसेवक मिलिंद पाटील म्हणाले की,हे पक्षांतर म्हणजे एका विकास पुरुषा कडून महा विकास पुरुषा कडे जाणारा प्रवास आहे. या पक्षांतरात आम्हा कुणाचाही कोणत्याही प्रकारचा मतलब अथवा स्वार्थ नसून केवळ काळव्याच्या सर्वांगीण विकासासाठी झालेला हा पक्ष प्रवेश आहे.

# पंढरपूर विकास आराखडा; मालमत्ताधारकांनी सर्व्हेक्षणास सहकार्य करण्याचे आवाहन

## १२ पथकाव्दारे महाविद्यालयीन विद्यार्थी व नगरपालिका कर्मचारी करणार प्राथमिक सर्व्हेक्षण



**अक्षराज: विकास सरवळे**

**दि.०८, पंढरपूर :** श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपूरला आषाढी आणि कार्तिकी एकादशीला लाखो आणि दररोज मोठ्या संख्येने भाविक येतात. पंढरपुरात येणाऱ्या भाविकांना व स्थानिक नागरिकांना पायाभूत सुविधा देण्यासाठी पंढरपूर विकास आराखडा तयार करण्यात येणार आहे. यासाठी प्राथमिक सर्वेक्षण करण्यात येत असून १२ पथकाद्वारे मालमत्तांचे सर्वेक्षण करण्यात येत आहे. संबधित मालमत्ताधारकांनी सर्वेक्षणासाठी येणाऱ्या पथकास योग्य माहिती देवून सहकार्य करावे असे आवाहन प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

पंढरपूर येथील विकास आराखड्याबाबत स्थानिक नागरिक, व्यापारी विक्रेते, महाराज मंडळी यांच्याशी प्राथमिक चर्चा करून समस्या जाणून घेण्यासाठी केबीपी कॉलेज, पंढरपूर येथे दिनांक ०१ मे व ०२ मे २०२५ रोजी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी चर्चा केली होती. त्याअनुषंगाने प्राथमिक सर्व्हे गुरुवार, दिनांक ०८ मे २०२५ पासून सुरु करण्यात आला आहे. सदर सर्व्हे १२ पथकाद्वारे करण्यात येत असून, या पथकात केबीपी कॉलजचे वरिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थी, पंढरपूर नगरपालिकेचे अधिकारी-कर्मचारी यांचा समावेश आहे. सदरचे सर्वेक्षण प्राथमिक असून ६३० मालमत्ताधारकांचा सर्व्हे करण्यात येणार आहे.

सर्वेक्षणामुळे बाधित नागरिकांचे सामाजिक, आर्थिक परिणामांची माहिती गोळा होणार असल्याने विकास आराखड्याची व्याप्ती लक्षात घेवून संबधितांना विश्वासात घेवून द्यावयाची भरपाई व पुनर्वसन याबाबत प्रस्ताव तयार करण्यात येणार येईल. बाधितांची कमीत कमी जागा घेऊन जास्तीत जास्त लाभ कसा देता येईल. याबाबत ही प्रयत्न करण्यात येणार आहे.

पंढरपूर विकास आराखड्यातील बाधितांची सर्व्हे पथकाकडून संबंधित मालमत्ता धारकांचे नाव, वय, जातीचा प्रवर्ग, व्यवसाय, जागेचे क्षेत्रफळ, नगर भूमापन क्रमांक, मिळकत पत्र, भाडेकरुचे नाव, कुळ, बाधित जागेचे मंदिरापासून अंदाजे अंतर, महत्वाच्या रस्त्यापासून असलेले अंतर, बाधित जागेची दर्शनी बाजू, बांधकामाचे वर्णन व प्रकार, जागा कोणत्या कारणासाठी वापरात आहे. व्यवसायासाठी असाणाऱ्या जागेचा कधीपासून वापर करण्यात येत आहे.

प्रमुख चार वाऱ्यांमध्ये व्यावसायिक वापरांतून होणारे अंदाजे उत्पन्न, संपादनामुळे बाधित होणारे उत्पन्न, पुनर्वसनाचा लाभ अपेक्षित आहे का? पुनर्वसनासाठी पसंतीचे ठिकाणे, मालमत्तेच्या अनुषंगाने मालक आणि भाडेकरु तसेच कूळ यांच्यामध्ये जागेबाबत वाद आहे का? मालमत्तेवर कर्ज गहाणखत बोजा, पुनर्वसन दरम्यान तात्पुरत्या घरांची गरज तसेच पुनर्वसन प्रक्रियेबाबत सुचना व अभिप्राय आदीबाबत माहिती सर्वेक्षण पथकाकडून गोळा करण्यात येणार आहे.

# वडगाव आमली येथे कामाचा शुभारंभ



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०८, पारनेर (अहिल्यानगर) :** वडगाव आमली येथील साठा बंधाऱ्याचे गाळमुक्ती आणि खोलीकरणाचे काम शेतकऱ्यांसाठी वरदान ठरेल. गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजनेमुळे पाणी साठवण क्षमता वाढेल आणि शेतीला नवसंजीवनी मिळेल. टाटा मोटर्स, नाम फाउंडेशन आणि ग्रामस्थांच्या सहकार्याने हा प्रकल्प यशस्वी होईल. असे मत पारनेर नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ पाटील यांनी व्यक्त केले.

वडगाव आमली येथील साठा बंधाऱ्यामधील गाळ काढणे आणि खोलीकरणाच्या महत्त्वाकांक्षी कामाला आज महाराष्ट्र शासनाच्या गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार या योजनेअंतर्गत भव्य शुभारंभ झाला. टाटा मोटर्स आणि नाम फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबवण्यात येणाऱ्या या प्रकल्पामुळे परिसरातील जलसाठ्याची क्षमता वाढणार असून, शेतीसाठी पाण्याची उपलब्धता सुधारण्यास मोठी मदत होणार आहे. या कामाचा शुभारंभ लोकप्रिय आमदार काशिनाथ दाते यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. यावेळी आयोजित कार्यक्रमाला भारतीय जनता पक्षाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य विश्वनाथ कोरडे, ज्येष्ठ नेते वसंत चेडे, सुभाषराव दुधाडे यांच्यासह अनेक मान्यवरांनी प्रमुख पाहुणे म्हणून हजेरी लावली.

या प्रकल्पाच्या माध्यमातून स्थानिक शेतकऱ्यांना त्यांच्या शेतजमिनीच्या सुपीकतेत वाढ होण्यास मदत होईल आणि गाळमुक्त बंधाऱ्यामुळे पाण्याचा साठा दीर्घकाळ टिकून राहील, असे मत मान्यवरांनी यावेळी व्यक्त केले. कार्यक्रमाला गावातील शंकर ढोणे, राम दास बोरूडे, बाळासाहेब सोनावळे, शिवाजी पवार, जनार्धन डेरे, संतोष सोनावळे, सुभाष डेरे, प्रशांत ढोणे, योगेश ढोणे, साहेबराव गुंजाळ, सुनिल जाधव, तुकाराम पवार, पोपट डेरे, भाउसाहेब सोनावळे, दत्तात्रय पवार, अप्पा पवार, किसन जाधव, आण्णा सालके, मोहन काळे, नवनाथ काळे, नवनाथ सालके यांच्यासह अनेक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गरुड फाउंडेशनचे राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

## वसंत रांधवण, ॲड.प्रमोद दिवेकर, अनिकेत घुले, निलेश व्यवहारे पुरस्काराचे मानकरी



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०८, अहिल्यानगर :** महाराष्ट्र गरुड फाउंडेशनच्या वतीने महाराष्ट्रातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या १२० व्यक्तींना राज्यस्तरीय पुरस्कार २०२५ जाहीर करण्यात आले असून, सामाजिक, शैक्षणिक, पत्रकारिता, व्याख्याते, लेखक, उद्योग, आर्थिक, क्षेत्रात, महिला सक्षमीकरण आदी क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करणारे दैनिक अक्षराज वृत्तपत्राचे पत्रकार वसंत रांधवण (पारनेर भूषण), ॲड.प्रमोद दिवेकर (समाज रत्न), अनिकेत घुले (समाज भूषण) व निलेश व्यवहारे (समाज भूषण) यांचा या पुरस्काराने सन्मान होणार आहे.

महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी येथे ७ जूनला प्रमुख मान्यवरांच्या हस्ते हे पुरस्कार दिले जाणार असल्याची माहिती गरुड फाऊंडेशनचे अध्यक्ष आकाश पुजारी, संस्थेचे कार्याध्यक्ष तथा मुख्य संयोजक रमेश खेमनर व पुरस्कार निवड समितीचे प्रमुख वसंत रांधवण, बाळकृष्ण भोसले, आर.आर.जाधव यांनी दिली. पारनेर सारख्या ग्रामीण भागातील असलेले वसंत रांधवण हे अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे पारनेर तालुका उपाध्यक्ष तसेच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे तालुका उपाध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. गेल्या १६ वर्षापासून ते ग्रामीण भागातील प्रश्न निर्भिडपणे मांडत असून सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग घेत आहेत. त्यांना पारनेर भूषण, पुण्यासारख्या शहरात शैक्षणिक, कायदेविषयक जनजागृती त्याचबरोबर पत्रकारिता क्षेत्राच्या माध्यमातून प्रशासकीय यंत्रणेत सुधारणा, सामाजिक कार्यात सतत सहभागी असणारेप्रमोद दिवेकर यांना समाजरत्न, संविधान प्रचारक, शिक्षण क्षेत्रात गरीब मुलांच्या हक्कासाठी काम करणारे, शिवाजी कोण होता. या पुस्तकाचे मुलांना वाटप करून युवक युवतीसाठी लोकशाहीचे गाईड ह्या पुस्तकाचे लेखक अनिकेत घुले यांना समाज भूषण आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील फर्निचर उद्योग क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे निलेश व्यवहारे यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर करण्यात आले असल्याचे गरुड फाउंडेशनचे मुख्य संयोजक रमेश खेमनर व गरुड फाउंडेशनच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

# उन्हाळ्यात विजेचा लपंडाव सुरू नागरिक त्रस्त

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.०८, मुदखेड (नांदेड) :** राज्यात उन्हाळ्याची चाहूल लागताच अनेक भागांमध्ये विजेच्या लपंडावामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. अचानक वीज पुरवठा खंडित होणे आणि अनियमित वीज ये-जा करणे यामुळे सामान्य जनजीवन विस्कळीत झाले आहे. विशेषता: ग्रामीण आणि निमशहरी भागांमध्ये ही समस्या अधिक गंभीर रूप धारण करत आहे. गेल्या काही दिवसांपासून अनेक शहरांमध्ये दिवसांतून अनेक वेळा वीज गुल होत आहे. यामुळे घरात पंखे, कुलर आणि ए.सी असूनही नागरिक उकाड्याने हैराण झाले आहेत. रात्रीच्या वेळी अचानक वीज गेल्याने लहान मुले आणि वयोवृद्धांना अधिक त्रास सहन करावा लागत आहे. केवळ घरगुती वापरासाठीच नाही तर शेतातील पिकांसाठी शेतकरी वर्ग विजेच्या या लपंडावामुळे चिंताग्रस्त झाला आहे. औद्योगिक क्षेत्रावरील याचा मोठा परिणाम होत आहे आणि छोटी मोठी उद्योग धंदे वीज नसल्यामुळे ठप्प पडले आहेत.

ज्यामुळे कामगारांचे व शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. या वीज पुरवठा खंडित होण्यामागे अनेक कारणे असल्याचे बोलले जात आहेत. वाढत्या तापमानामुळे विजेच्या मागणीत झालेली वाढ आणि जुन्या विज वाहिन्या तसेच उपकरणावरील ताण हे प्रमुख कारण मानले जात आहे. अनेक ठिकाणी दुरुस्तीची कामे वेळेवर न झाल्यामुळे किंवा देखभाल व्यवस्थित न केल्यामुळे ही समस्या अधिक गंभीर झाली आहे असा आरोप नागरिक करत आहेत.

# १०० दिवसाच्या कार्यालयीन सुधारणा मोहिमेत चंद्रपूर राज्यात प्रथम



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०७, चंद्रपूर :** राज्य शासनाच्या १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा मोहिमेत चंद्रपूर जिल्ह्याने राज्यातून प्रथम क्रमांक पटकाविला. त्या अनुषंगाने दिनांक ०७ मे २०२५ रोजी मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते जिल्हाधिकारी विनय गौडा यांचा प्रशस्तिपत्र देऊन सन्मान करण्यात आला. मुख्यमंत्र्यांच्या संकल्पनेतून राज्यातील शासकीय कार्यालयांना शिस्त लावणे, नागरिकांची कामे जलदगतीने पूर्ण होणे आणि शासन-प्रशासन व नागरिकांमधील विश्वास वृद्धिंगत होणे.

या उद्देशाने १०० दिवसांची कार्यालयीन सुधारणा मोहीम हाती घेण्यात आली होती. या मोहिमेच्या पहिल्या टप्प्यांचे मूल्यमापन महाराष्ट्र दिनी जाहीर करण्यात आले. यात उत्कृष्ट जिल्हाधिकारी कार्यालय श्रेणीत चंद्रपूर जिल्हाधिकारी कार्यालयाने बाजी मारली. जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्या नेतृत्वात ८४.२९ गुण मिळवत चंद्रपूर जिल्हाधिकारी कार्यालयाने राज्यात प्रथम क्रमांक पटकाविला. या सर्व निकषांवर परिपूर्ण उतरुन चंद्रपूर जिल्हाधिकारी कार्यालय राज्यात सर्वोत्कृष्ट ठरले.

# थोडक्यात

## धाराशिव येथील जिल्हास्तरीय बैठकीत कार्यकर्त्यांचा सूर

### स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आम आदमी पार्टीने स्वबळावर लढवाव्यात



**अक्षराज : विकास वाघ**

**दि.०८, धाराशिव :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आम आदमी पार्टी स्वबळावर लढवावी असा निर्णय धाराशिव येथे घेण्यात आलेल्या बैठकीत घेण्यात आला. त्यासाठी वरिष्ठ पातळीवरून पक्षाचे सहकार्य मिळावे अशी अपेक्षा देखील व्यक्त करण्यात आली. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आम आदमी पार्टीच्या जिल्हा कार्यकारिणीची बैठक वरिष्ठ पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पार पडली. बैठकीस पक्षाचे राज्य सचिव डॉ.अभिजीत मोरे, राज्य संघटन सचिव ॲड.मनीष मोडक, सोशल मीडिया प्रमुख प्रा. नामदेव भागिले पाटील, जिल्हाध्यक्ष राहुल माकोडे, जिल्हा उपाध्यक्ष तानाजी पिंपळे, जिल्हा उपाध्यक्ष राजपाल देशमुख, शहराध्यक्ष बिलाल रजवी, जिल्हा संघटक संजय दनाने, तालुका संघटक मुक्तार शेख, युवक जिल्हाध्यक्ष शिवप्रसाद काजळे, सुरेश शेळके, कृष्णा कुमार यांच्यासह आम आदमी पार्टीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीत आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष राहुल माकोडे म्हणाले की, आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगर परिषद या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार्टीने स्वबळावर लढण्याची मागणी जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते करत आहेत. त्यासाठी वरिष्ठ स्तरावरून आदेश मिळावेत. त्याचबरोबर स्थानिक पातळीवरील जनतेच्या प्रश्नांबाबत जनजागृती करण्याबाबतही त्यांनी वक्तव्य केले. राज्यस्तरीय पदाधिकाऱ्यानी यावेळी बोलताना, कार्यकर्त्यांच्या भावना पक्षश्रेष्ठीपर्यंत पोहचविणार असल्याचे सांगितले. या बैठकीनंतर आम आदमी पार्टीच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आम आदमी पार्टीचे खाते उघडण्यासाठी वेगात हालचाली सुरू झाल्या आहेत.

## पंढरपूरात अवैध वाळू वाहतूकीवर महसूल प्रशासनाची कारवाई; २ वाहने केली जप्त

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०७, पंढरपूर :** अवैध वाळू उपसा व वाहतूकी विरोधात पंढरपूरच्या महसूल विभागाने धडक मोहीम हाती घेतली आहे. महसूल प्रशासनाच्या पथकाने भीमा नदीपात्रात अवैध वाळू वाहतूकीसाठी वापरण्यात येणारे अशोक लेलँडचा एक पिकअप व टाटा कंपनीचा एक पिकअप अशी दोन वाहने जप्त करण्यात आल्याची माहिती तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली.

पंढरपूर तालुक्यातील अवैध वाळू उपसा रोखण्यासह वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्यांच्या विरोधात कारवाई करण्यासाठी प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसिलदार सचिन लंगुटे यांनी विविध पथकांची नेमणूक केली आहे. दिनांक ०५ मे २०२५ रोजी पहाटे गोपाळपूर भीमा नदी पात्रामध्ये अवैध वाळू वाहतुकीसाठी वापरण्यात आलेल्या टाटा कंपनीचे विना नंबरचा एक पिकअप व दिनांक ०७ मे रोजी दुपारी गोपाळपूर- मुढेवाडी रस्त्यावर वाहतूक करताना अशोक लेलंड कंपनीचा पिकअप वाहन क्रमांक एम एच-१२-जीटी-८७१५ अशी दोन वाहने पकडण्यात आली. सदर वाहने शासकीय धान्य गोदाम पंढरपूर येथे लावण्यात आली आहेत. या कारवाईमध्ये मंडळ अधिकारी कासेगांव पंकज राठोड, ग्राम महसूल अधिकारी साईनाथ अडगटाळे सहभागी होते.

## टाकळीढोकेश्वर परिसरात वन्यप्राण्यांसाठी पाणवठे तयार करा; पाण्याच्या शोधार्थ वन्यप्राणी, पशु पक्षी सैरभैर

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०८, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर परिसरातील डोंगररांगांमध्ये वन्यप्राण्यांसाठी पाणवठे तयार करून त्यांमध्ये पाणी सोडण्याची मागणी संदिप झावरे व पशुप्रेमींनी केली आहे. टाकळी ढोकेश्वर परिसरात पाण्याचा तुटवडा जाणवत असून वन्य प्राण्यांचे पाण्यावाचून हाल होत आहेत. त्यामुळे डोंगररांगांमध्ये पाणवठे तयार करून त्यामध्ये पाणी सोडण्याची मागणी केली आहे. टाकळी ढोकेश्वर तसेच निवडुंगेवाडी, भेंद्रे गावच्या चोहोबाजूंनी डोंगराळ भाग मोठ्या प्रमाणात आहेत. या डोंगररांगांमध्ये हरीण, काळवीट, लांडगे, ससा, कोल्हे, खोकड, तरस, साळींदर, मोर याचबरोबर विविध प्रजातींचे पक्षी आढळतात. या डोंगररांगांमध्ये बिबट्याने ही अनेक वेळा दर्शन दिले आहे. सद्य:स्थितीत डोंगररांगांमधील पाणी संपल्याने वन्यप्राण्यांचे पिण्याच्या पाण्यासाठी अतोनात हाल होत आहेत. वन्यप्राणी पिण्याच्या पाण्याच्या शोधार्थ मानवी वस्तीकडे धाव घेताना दिसून येत आहेत. मानवी वस्तीवर आलेल्या वन्यप्राण्यांचा कुत्र्यांच्या हल्लयात तसेच रस्ते अपघातात मृत्यू झाल्याचे प्रकार परिसरात अनेक वेळेस घडलेले आहेत. त्यामुळे वनविभागाकडून तत्काळ पाणवठे बनवून वन्य प्राण्यांच्या पिण्याचा पाण्याचा प्रश्न सोडवावा, अशी मागणी संदिप झावरे व टाकळी ढोकेश्वर येथील पशुप्रेमी यांनी केली आहे.

## मुर्टी येथील भैरवनाथ देवाची यात्रा उत्साहात संपन्न

**अक्षराज : शरद भगत**

**दि.०७, मुर्टी (बारामती) :** बारामती तालुक्यातील मुर्टी येथील माता जोगेश्वरी व भैरवनाथ देवाच्या यात्रेस हजारो भाविक उपस्थित होते .ही यात्रा अक्षय तृतिया नंतर भरते. बारामती तालुक्यातील ही सर्वात मोठी यात्रा असल्याचे येथिल नागरिक सांगत आहेत. दि.०२ मे रोजी या यात्रेनिमित्त बैलगाडा प्रेमींसाठी बैलगाडा शर्यतीचे आयोजन केले होते. यामध्ये प्रथम क्रमांकाचे बक्षिस ८१ हजार रुपये सचिन रोहीदास बालगुडे व विलास हरिदास बालगुडे यांनी दिले. द्वितीय बक्षिस ६१ हजार रुपये सतिश शिवाजी जगदाळे, धनंजय रामदास जगदाळे व संदिप मांगडे यांनी दिले. तृतिय बक्षिस ४१ हजार रुपये लालासो नलवडे व बाळासो गुलाब जगदाळे यांनी दिले. तर फायनलमध्ये गेलेल्या १ ते ७ क्रमांकाची बक्षिसे देण्यात आली होती. दि.०५ मे रोजी माता जोगेश्वरी व भैरवनाथ देवाचे मोठ्या उत्साहात लग्न समारंभाचा कार्यक्रम संपन्न झाला. या विवाह प्रसंगी मुर्टी पंचक्रोशीतील महीला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. विवाह सोहळा संपन्न झाल्यानंतर कैपोपटराव दाजीराम जगदाळे यांच्या स्मरणार्थ राजू शेठ पोपटराव जगदाळे यांच्याकडून सर्वांसाठी जेवनाची व्यवस्था करण्यात आली होती. तर सामाजिक कार्यकर्ते प्रशांत सुनिल जगताप यांच्याकडून सर्व भक्तांसाठी थंड पेय देण्यात आले. रात्री ८ वा तालवाद्या, पारंपारिक लेझीम खेळ तसेच ढोल ताशाच्या आवाजात पालखीची गाव प्रदक्षिणा झाली. दि.०६ मे रोजी आनंद लोकनाट्य तमाशा मंडळाचे दोन करमणुकीचे कार्यक्रम संपन्न झाले. निकाली कुस्त्यांचा कार्यक्रमात महाराष्ट्रातील नामवंत पैलवानानीं भाग घेतल्यामुळे कुस्ती प्रेमींची गर्दी देखीलपहायला मिळाली, तर दि.०७ मे रोजी महीलांसाठी धुमाकूळ नावाचा ऑर्केस्ट्रा कार्यक्रम ठेवला होता. या कार्यक्रमातून पहलगाव येथिल मृत झालेल्या भारतीय नागरिकांना श्रद्धांजली वाहण्यात आली.